# कार्यक्षमता प्रतवारीत मराठवाड्यातील जिल्ह्याच्या गुणांकावर शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाचा परिणाम

**स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड आंतरविद्याशाखीय अंतर्गत शिक्षणशास्त्र या विद्यावाचस्पती पदवीच्या अंशत: पूर्ततेसाठी सादर केलेला संशोधन आराखडा**


संशोधक

**संतोष भगवानराव शिंदे**

मार्गदर्शक

**डॉ. केशव वा. इंगोले**

**संशोधन केंद्र**

शिक्षणशास्त्र संकूल

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड


**जुलै : २०२४**

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पृ.क्र. |
|---|---|---|
| १. | शीर्षक | १ |
| २. | अनुक्रमणिका | २ |
| ३. | प्रस्तावना | ३-६ |
| ४. | संशोधनाची गरज | ६ |
| ५. | संशोधनाचे महत्त्व | ६ |
| ६. | समस्या विधान | ७ |
| ७. | कार्यात्मक व्याख्या | ७ |
| ८. | संशोधनाची उद्दिष्टे | ७ |
| ९. | संशोधनाची गृहीतके | ८ |
| १०. | संशोधन परिकल्पना | ८ |
| ११. | शून्य परिकल्पना | ९ |
| १२. | संशोधनाची व्याप्ती | ९ |
| १३. | संशोधनाची मर्यादा | १० |
| १४. | संशोधन परिमर्यादा | १० |
| १५. | संशोधन पद्धती | १० |
| १६. | नमुना निवड | ११-१२ |
| १७. | संशोधनाची साधने | १२ |
| १८. | संख्याशास्त्रिय परिमाणे | १२ |
| १९. | संशोधनाची कार्यवाही | १२ |
| २०. | प्रकरण रूपरेषा | १३ |
| २१. | अंदाजपत्रक | १३ |
| २२. | वेळापत्रक | १३ |
| २३. | संदर्भग्रंथ सूची | १४-१५ |
| २४. | संशोधक व मार्गदर्शकांचे नाव सही | १५ |

**प्रस्तावना**

भारत सरकारने सर्व राज्य व केंद्रशासित प्रदेशामधील सर्व शाळांचा विविध निकषांच्या आधारे अभ्यास करून कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक जाहीर केला आहे. यात महाराष्ट्र पहिल्या दहामध्ये आहे. भारत सरकारच्या मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या अंतर्गत राज्य व केंद्रशासित प्रदेशामधील शैक्षणिक गुणवत्ता, भौतिक सुविधा, समता अशा विविध उपघटकाच्या अंतर्गत मूल्यमापन करण्यात येते. त्यानुसार राज्याला यावर्षी ८६९ गुण मिळाले आहेत. मागील वर्षी ८०२ गुण मिळाले होते, तर २०१७/१८ मध्ये ७०० गुण होते. भारतामध्ये पंजाब ९१२ अंकासह प्रथम क्रमांकावर आहे. ९११ गुणासह चंदीगड द्वितीय तर तामिळनाडू ९०६ गुणासह तृतीय स्थानी आहे. गुजरात ८८४ गुणासह आठव्या स्थानी आहे. महाराष्ट्राच्या पुढे पाँडीचेरी, दिल्ली, अंदमान निकोबार आणि केरळ हे राज्य आहेत. अध्ययन निष्पत्ती साठी महाराष्ट्राला १४४ गुण मिळाले आहेत. उपलब्धता क्षेत्रासाठी ७६ गुण मिळाले असून भौतिक सुविधांसाठी राज्याला १२६ गुण मिळाले आहेत. समता या क्षेत्रामध्ये महाराष्ट्राला २२४ गुण मिळाले असून प्रशासकीय सेवा सुविधांसाठी राज्याने या वर्षी २९९ गुण प्राप्त केले आहेत.

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने 'कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांकांचा' अहवाल नुकताच प्रसिद्ध केला. प्रतवारी निर्देशांकाचा अहवाल तयार करताना शाळांमधील अध्ययन निष्पत्ती व गुणवत्ता, शाळेची उपलब्धता, भौतिक सोयी व सुविधा, समता, व्यवस्थापन प्रक्रिया आदी निकषांवर मुल्यांकन केले जाते. देशातील शिक्षण व्यवस्था आणि त्यासाठीचे मुल्यांकन करण्यासाठी सर्वप्रथम नीती आयोगाने २०१५-१६ व २०१६-१७ या वर्षाचा शालेय शिक्षण दर्जा निर्देशांक अहवाल प्रसिद्ध केला होता. त्या अहवालाचा आधार घेऊन केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने २०१८-१९ या शैक्षणिक वर्षाची कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक जाहीर केला होता. नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या अहवालात राज्याने प्रगती केल्याचे समोर आले आहे. २०१८-१९ मध्ये महाराष्ट्रासह झारखंड, उत्तर प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांनी २०१७-१८ पेक्षा चांगली कामगिरी केली

आहे. या राज्यांनी एकंदरीत गतवर्षीच्या तुलनेत १० टक्के प्रगती केली आहे. मागील वर्षीही आघाडीवर असलेल्या चंदीगढ राज्याने अव्वल स्थान कायम राखले आहे. तर गुजरात दुसऱ्या स्थानावर आहे. राज्यातील सरकारी शाळांची गुणवत्ता व तेथील कार्यक्षमता, सोयी-सुविधा याचा विचार करून जाहीर करण्यात येणाऱ्या 'कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांकात' यंदा महाराष्ट्राने पहिल्या पाच राज्यांत येण्याचा मान मिळवत प्रथम श्रेणी पटकावली आहे. काही विभागांमध्ये राज्य अव्वलही आले आहे. २०१७-१८ च्या तुलनेत महाराष्ट्राने १०२ गुणांनी मजल मारत ८०२ गुणांची कमाई केली आहे.

सरकारी शाळा आर्थिक, भौतिक व शैक्षणिकदृष्ट्या अध्यापही पूर्णत: सक्षम नाहीत. या सर्व सुविधा राज्यांनी शाळांमध्ये उपलब्ध करून देणे, तसेच त्यांच्या सबलीकरणासाठी आवश्यक धोरणात्मक निर्णय घेऊन त्याप्रमाणे शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करणे, शाळांच्या दर्जाचे मूल्यमापन करणे, शैक्षणिक सुधारणा करून योग्य असे शैक्षणिक नियोजन करणे, निधी उपलब्ध करून देणे आदी व्यापक उद्देशाने काही मापदंड आखून प्रत्येक राज्याची क्रमवारी निश्चित करण्यासाठी 'कार्यक्षमता प्रतवारी गुणांका'ला सुरुवात करण्यात आली आहे.

२०१४ नंतर सरकारने शिक्षण विभागात प्रशासकीय आणि व्यवस्थापकीय बदल केले. यात जिल्हा परिषदांच्या शाळांचा दर्जा वाढवण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात आले. यामध्ये प्रामुख्याने कृतिशील शिक्षणाला चालना देण्यात आली. परिणामी गेल्या काही वर्षात सुमारे एक लाख विद्यार्थ्यांनी इंग्रजी माध्यमातून जिल्हा परिषदांच्या शाळांत प्रवेश घेतला. तत्कालीन सरकारने घेतलेल्या निर्णयामुळे २०१९ च्या अहवालामध्ये राज्याला पहिल्या पाचमध्ये स्थान मिळाले.

**भारतातील कार्यक्षमता प्रतवारी गुणांकण दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | राज्य | वर्ष २०१७-१८ | वर्ष २०१८-१९ |
|---|---|---|---|
| १. | चंदीगड | ८४० | ८९० |
| २. | गुजरात | ८१० | ८७० |
| ३. | केरळ | ८२५ | ८६० |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | दिल्ली | ७४५ | ८३० |
| ५. | महाराष्ट्र | ७०० | ८०२ |

वरील तक्त्याचे अवलोकन केले असता चंदीगड ८४० व ८९० गुणासह भारतात 'कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांका'त पहिल्या स्थानावर आहे. गुजरात अनुक्रमे दुसऱ्या, केरळ तिसऱ्या, दिल्ली चौथ्या तर महाराष्ट्र पाचव्या स्थानी आहे. शैक्षणिक वर्ष २०१७-१८ मध्ये महाराष्ट्राचा कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक ७०० एवढा होता. तर २०१८-१९ मध्ये यात वाढ होऊन तो ८०२ गुणांकावर पोहोचला आहे. यावरून महाराष्ट्राच्या कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांकांमध्ये सुधारणा होताना दिसून येत आहे.

**मराठवाड्याचा कार्यक्षमता प्रतवारी गुणांकण दर्शविणारा तक्ता**

| अ.क्र. | जिल्हा | २०२०-२१ | २०२१-२२ |
|---|---|---|---|
| १. | छत्रपती संभाजीनगर | १५ | ६ |
| २. | बीड | ४ | १३ |
| ३. | धाराशीव | ८ | १६ |
| ४. | नांदेड | २२ | २० |
| ५. | लातूर | ७ | २६ |
| ६. | परभणी | ३० | २७ |
| ७. | हिंगोली | १६ | ३३ |
| ८. | जालना | ३३ | ३० |

वरील तक्त्यांचे निरिक्षण केले असता असे दिसून येते की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा शैक्षणिक वर्ष २०२१-२२ मध्ये कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक ६ एवढा असून तो मराठवाड्याचा सर्वाधिक आहे. त्यानंतर बीड जिल्हा कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक १३ तर धाराशीव जिल्ह्याचा कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक १६ ते दुसऱ्या व तिसऱ्या स्थानी आहेत. जालना आणि हिंगोली जिल्ह्याचा कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक अनुक्रमे ३० व ३३ असून ते

मराठवाड्यात सर्वात खाली आहेत. एकंदरीत यावरून छत्रपती संभाजीनगर जिल्हा वगळता मराठवाड्यातील इतर जिल्ह्याचा कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांक चिंताजनक आहे.

**संशोधनाची गरज**

महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्याचा कार्यक्षमता प्रतवारी निर्देशांकानुसार अनुक्रम पाहता छत्रपती संभाजीनगर ६, बीड १३, १६, नांदेड २०, लातूर २६, परभणी २७, जालना ३० आणि हिंगोली ३३ असा क्रम आहे. यावरून असे म्हणता येईल की, छत्रपती संभाजीनगर जिल्ह्याचा अपवाद वगळता महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्यातील इतर जिल्ह्याचा कार्यक्षमता प्रतवारी गुणांकन क्रमांक खुपच खाली आहे. एकंदरीत शिक्षणाचा दर्जा फारच खालावलेला दिसून येतो. त्यामुळे शिक्षणाचा खालावलेला दर्जा सुधारावा म्हणून महाराष्ट्र शासनाकडून शालेय शिक्षकांना सेवांतर्गत प्रशिक्षण वेळोवेही दिले जाते. परंतु शिक्षकांना प्रशिक्षण देऊनसुद्धा मराठवड्याच्या गुणाकंनात सुधारणा झाली नाही. त्यामुळे मराठवाड्यातील कार्यक्षमता प्रतवारी गुणाकांची अध्ययन निष्पत्ती, उपलब्ध क्षेत्र, भौतिक सुविधा, समता आणि प्रशासकीय सेवा सुविधा इत्यादी घटकांचा सखोल अभ्यास करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यासाठीच **कार्यक्षमता प्रतवारीत मराठवाड्यातील जिल्ह्यांच्या गुणांकावर शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाचा परिणाम** हा विषय मी संशोधन कार्यासाठी निवडला आहे.

**संशोधनाचे महत्त्व**

भारतामध्ये महाराष्ट्राची ओळख पुरोगामी महाराष्ट्र म्हणून आहे. परंतु कार्यक्षमता प्रतवारीचा अभ्यास करता महाराष्ट्राच्या शालेय शिक्षणाचा स्तर घसरलेला दिसून येतो. तसेच महाराष्ट्राच्या तुलनेत मराठवाड्याच्या शालेय शिक्षणाचा दर्जा फारच सुमार असलेला दिसून येतो. मराठवाड्यातील कार्यक्षमता प्रतवारी गुणाकांची अध्ययन निष्पत्ती, उपलब्ध क्षेत्र, भौतिक सुविधा, समता आणि प्रशासकीय सेवा सुविधा इत्यादी बाबतीत मराठवाडा मागास राहण्याचे कारणे, त्यावरील उपाय योजना सुचविणेही महत्त्वाचे आहे. तसेच समकालीन

स्थितीमध्ये मराठवाड्याचा शालेय शिक्षणाचा दर्जा सुधारला तर येथील कर्तव्यनिष्ट व गुणवान विद्यार्थी घडतील. दुसरी बाब म्हणजे इंग्रजी शाळेच्या तुलनेत मराठी माध्यमाच्या शाळेकडे लोकांचा बघण्याचा दृष्टिकोन बदलनेही महत्त्वाचे आहे. त्यामुळे “कार्यक्षमता प्रतवारीत मराठवाड्यातील जिल्ह्यांच्या गुणांकावर शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाचा परिणाम” या विषयावर संशोधन महत्त्वाचे होते.

**समस्या विधान**

कार्यक्षमता प्रतवारीत मराठवाड्यातील जिल्ह्यांच्या गुणांकावर शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाचा परिणाम

**कार्यात्मक व्याख्या**

१. **कार्यक्षमता प्रतवारी** : कार्यक्षमता प्रतवारी ही गुणवत्ता व्यवस्थानाच्या संदर्भात उपयोगात आणली जाते. तसेच विविध संसाधनांचा उपयोग करून विद्यार्थ्यांची गुणवता वाढीसाठी प्रयत्न केले जातात.

२. **जिल्ह्याचा गुणांक** : भारतामध्ये वापरल्या जाणाऱ्या कार्यक्षमता प्रतवारीच्या निकषांवर अनेक घटक परिणाम करू शकतात. ज्यामध्ये विषयातील अडचणीची पातळी, वापरलेल्या मूल्यांकनाचा प्रकार आणि विद्यार्थ्यांचा शैक्षणिक स्तर यांच्या आधारे जिल्ह्यांचा गुणांक ठरविला जातो.

३. **सेवांतर्गत प्रशिक्षण** : प्राथमिक व उच्च माध्यमिक स्तरांवर परिणामकारक अध्यापन कार्य करणे व सुयोग्य विद्यार्थी घडविण्याचे कौशल्ये ज्या शिक्षणाच्या माध्यमातून शिक्षकाला प्रशिक्षण दिले जाते त्याला सेवांतर्गत प्रशिक्षण म्हटले जाते.

**संशोधनाची उद्दिष्टे**

१. कार्यक्षमता प्रतवारी गुणांकन या संकल्पनेचा अभ्यास करणे.

२. कार्यक्षमता प्रतवारी गुणांकनाचा भारतातील इतर राज्य व महाराष्ट्राचा आढावा घेणे.

३. मराठवाड्यातील कार्यक्षमता प्रतवारीत गुणांकावर शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या परिणामाचा अभ्यास करणे.

४. मराठवाड्यातील कार्यक्षमता प्रतवारी गुणांकनामध्ये उपाय योजना सूचविणे.

५. मराठवाड्याच्या शैक्षणिक पार्श्वभूमीचा आढावा घेणे.

**संशोधनाची गृहीतके**

१. कार्यक्षमता प्रतवारी गुणांकन ही संकल्पना शिक्षणाच्या गुणवत्तेशी निगडित आहे.

२. कार्यक्षमता प्रतवारी गुणांकनामध्ये भारत व महाराष्ट्र राज्याचा अभ्यास महत्त्वाचा आहे.

३. कार्यक्षमता प्रतवारीत गुणांकावर शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या परिणामाचा योग्य प्रभाव पडलेला दिसून येत नाही.

४. मराठवाड्यातील कार्यक्षमता प्रतवारी गुणांकनामध्ये उपाय योजना करणे महत्त्वाचे आहे.

५. मराठवाड्याला शैक्षणिक पार्श्वभूमी लाभली आहे.

**संशोधन परिकल्पना**

१. कार्यक्षमता प्रतवारी गुणांकन ही संकल्पना प्राथमिक शालेय शिक्षणाच्या गुणवत्तेशी संबंधित आहे.

२. मराठवाड्याच्या कार्यक्षमता प्रतवारीत गुणांकावर प्राथमिक शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या परिणामाचा प्रभाव पडला नाही.

३. कार्यक्षमता प्रतवारी गुणांकनामध्ये भारतातील इतर राज्य व महाराष्ट्र राज्याचा तुलनात्मक अभ्यास करणे महत्त्वाचे आहे.

४. मराठवाड्यातील कार्यक्षमता प्रतवारी गुणांकनाचा दर्जा सुधारण्यासाठी उपाय योजना करणे आवश्यक आहे.

**शून्य परिकल्पना**

१. मराठवाड्यातील शालेय शिक्षणात सेवांतर्गत शिक्षणामुळे विद्यार्थ्यांच्या कौशल्य विकासासाठी उपयोगात आणलेल्या शून्य परिकल्पनेचा सार्थ फरक पडत नाही.

२. कार्यक्षमता प्रतवारी गुणाकंनाच्या बाबतीत शून्य परिकल्पनेचा गुणवत्तेवर काही सार्थ फरक पडत नाही.

३. शिक्षकांच्या प्रशिक्षणाचा विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेवर कोणत्याही प्रकारचा सार्थ फरक पडत नाही.

४. शालेय शिक्षकांच्या पूर्व व उत्तर चाचणीतील गुणांकाच्या मध्यमानात शून्य परिकल्पनेचा सार्थ फरक पडत नाही.

**संशोधनाची व्याप्ती**

**१. आशय व्याप्ती**

हे संशोधन मराठवाड्यातील सर्व जिल्ह्याच्या शालेय गुणांकावर संबंधित आहे.

**२. घटक व्याप्ती**

हे संशोधन कार्यक्षमता प्रतवारीत शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाशी संबंधित आहे.

**३. क्षेत्र व्याप्ती**

हे संशोधन मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशीव, परभणी, लातूर, नांदेड आणि हिंगोली या ८ जिल्हे जिल्ह्याशी संबंधित आहे.

**४. काल व्याप्ती**

हे संशोधन २०२२-२३ ते २०२४-२५ हा कार्यकाल संशोधनाशी निश्चित केलेला आहे.

**संशोधनाची मर्यादा**

**१. आशय मर्यादा**

हे संशोधन मराठवाड्यातील ८ जिल्ह्याशी मर्यादीत आहे.

**२. घटक मर्यादा**

हे संशोधन कार्यक्षमता प्रतवारीत शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षण या घटक मर्यादेशी संबंधित आहे.

**३. क्षेत्र मर्यादा**

हे संशोधन मराठवाड्यातील छत्रपती संभाजीनगर, जालना, धाराशीव, परभणी, लातूर, नांदेड आणि हिंगोली या ८ जिल्ह्याच्या क्षेत्र मर्यादेशी निगडित आहे.

**४. काल मर्यादा**

हे संशोधन २०२२-२३ ते २०२४-२५ या कालावधी पुरतेच मर्यादीत असणार आहे

**संशोधनाची परिमर्यादा**

१. प्रस्तुत संशोधन मराठवाड्यातील कार्यक्षमता प्रतवारी गुणांकाशी मर्यादीत राहणार आहे.
२. प्रस्तुत संशोधनाची भौगोलिक परिमर्यादा ही मराठवाड्याच्या ८ जिल्ह्याशी संबंधित मर्यादीत असणार आहे.
३. प्रस्तुत संशोधन हे शालेय शिक्षणाच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाच्या परिणामाच्या आधारे करण्यात येणार आहे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधनासाठी बहू संशोधन पद्धतीचा उपयोग करण्याचे निश्चित आहे. प्रस्तुत संशोधन विषय कार्यक्षमता प्रतवारी गुणांकनाशी संबंधित असल्यामुळे वर्णनात्मक पद्धतीचा अवलंब करण्यात येणार आहे. त्याच बरोबर शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षणाचा

परिणामाचा संबंध येत असल्यामुळे सर्वेक्षणात्मक पद्धतीचाही उपयोग करण्यात येणार आहे. सर्वेक्षणातून कार्यक्रम विकसनाची आवश्यकता आढळून आली तर कार्यक्रम विकसन पद्धतीचा उपयोग करण्यात येईल. एकंदरीत प्रस्तुत संशोधन हे मिश्र संशोधन पद्धतीवर अवलंबून आहे.

**नमुना निवड**

नमुना निवडीच्या प्रामुख्याने संभाव्यता आणि गैर संभाव्यता अशा दोन पद्धती आहेत. प्रस्तुत संशोधनाची प्रश्नावली भरून घेण्यासाठी संभाव्यता नमुना निवड पद्धतीतील क्षेत्र पद्धतीचा उपयोग करण्यात येईल. याद्वारे मराठवाड्यात ८ जिल्हे असून यामध्ये ७६ तालुके आहेत. मराठवाड्यातील प्रत्येक तालुक्याचा अभ्यास करणे शक्य नसल्याने न्यायदर्श पद्धतीद्वारे प्रत्येक जिल्ह्यातून एका तालुक्याची निवड केली जाईल. प्रत्येक तालुक्यातून जिल्हा परिषेदेच्या १० प्राथमिक शाळा या प्रमाणात ८ तालुक्यातून जिल्हा परिषेदेच्या ८० प्राथमिक शाळा निवडल्या जाईल. ८० शाळेतून ८० मुख्याद्यापक, प्रत्येक शाळेतून २ या प्रमाणात १६० शिक्षक आणि ८० शाळेतून प्रत्येकी ४ विद्यार्थी या प्रमाणात ८० शाळेतून ३२० विद्यार्थी असे एकूण ५६० उत्तरदाते निवडले जातील.

| **अ.क्र.** | **घटक** | **संख्या** | **शेकडा प्रमाण** |
|---|---|---|---|
| १. | जिल्हे | ८ | -- |
| २. | तालुके | ८ | -- |
| ३. | शाळा | ८० | -- |
| ४. | मुख्याद्यापक | ८० | १४.२८ |
| ५. | शिक्षक | १६० | २८.५७ |
| ६. | विद्यार्थी | ३२० | ५७.१५ |
| | **एकूण** | **५६०** | **१००.००** |

**संशोधनाची साधने**

प्रस्तुत संशोधनाची माहिती संकलीत करण्यासाठी खालील संशोधन साधनाचा उपयोग करण्यात येणार आहे.

१. कार्यक्षमता प्रतवारी गुणांकन अहवाल

२. कार्यक्षमता प्रतवारी गुणांकनाचा भारतातील इतर राज्य व महाराष्ट्राचे अहवाल

३. कार्यक्षमता प्रतवारीत गुणांकावर शालेय शिक्षकांच्या सेवांतर्गत प्रशिक्षण अंतर्गत प्रश्नावली.

४. मराठवाड्याच्या शैक्षणिक पार्श्वभूमीशी संबंधित वेगवेगळ्या समित्याच व आयोगाचे अहवाल.

**संख्याशास्त्रीय परिमाणे**

प्रस्तुत संशोधनच्या प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी खालीलप्रमाणे संख्याशास्त्रीय परिमानांचा उपयोग करण्यात येणार आहे.

प्राप्त माहितीचे विश्लेषण करण्यासाठी शेकडेवारीचा उपयोग करण्यात येईल. तसेच मध्यान, प्रमाण विचलन, टी परिक्षिका इत्यादी परिणामांचा उपयोग करण्यात येईल.

**संशोधनाची कार्यवाही**

प्रस्तुत संशोधनासाठी खालील कार्यवाहीचा उपयोग करण्यात येईल.

१. सर्वप्रथम साहित्याचा आढावा व समस्येची निश्चिती करण्यात येईल.

२. उद्दिष्टे आणि गृहीतकानुसार नमुना कार्यपद्धती निश्चित केली जाईल.

३. साधन निर्मितीसाठी शिक्षकांची प्रश्नावली तयार केली जाईल.

४. माहितीचे संकलन केले जाईल.

५. संकलीत झालेल्या प्राप्त माहितीचे विश्लेक्षण अर्थनिर्वचन करण्यात येईल.

६. लिखानपूर्ण झाल्यानंतर ते मार्गदर्शकांकडून तपासून घेण्यात येईल.

७. नियम व अटीच्या अधीन राहून प्रबंधाची बांधणी करून ते विद्यापीठास सादर केले जाईल.

**प्रकरणाची रूपरेषा**

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : सशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : मराठवड्याची ओळख

प्रकरण चौथे : संकलित माहितीचे अर्थनिर्वचन

प्रकरण पाचवे : सारांश, निष्कर्ष व शिफारशी

**अंदाजपत्रक**

| **अ.क्र.** | **घटक** | **अपेक्षीत खर्च** |
|---|---|---|
| १. | विद्यापीठ प्रवेश शुल्क | १७,०००-/ |
| २. | माहिती संकलन करणे | २५,०००/- |
| ३. | डि.टी. पी. खर्च | १५,०००/- |
| ४. | सुद्धलेखन खर्च | १२,०००/- |
| ५. | प्रिंट खर्च | ५,०००/- |
| ६. | बाँड पेपर खर्च | ५,०००/- |
| ७. | प्रबंध बांधणी खर्च | १०,०००/- |
| | इतर खर्च | १५,०००/- |
| | **एकूण खर्च** | **१,०४,०००/-** |

**वेळापत्रक**

| **अ.क्र.** | **विवरण** | **कालावधी** |
|---|---|---|
| १. | कोर्सवर्क तयारी | १-६ महिने |
| २. | संशोधन आराखडा | ७-१२ महिने |
| ३. | माहिती संकलन | १३-१८ महिने |
| ४. | पहिले व दुसरे प्रकरण लिहिणे | १९-२४ महिने |
| ५. | तिसरे व चौथे प्रकरण लिहिणे | २५-३० महिने |
| ६. | अंतिम संशोधन अराखडा तयार करणे | ३१-3६ महिने |

## संदर्भग्रंथ सूची


आगलावे प्रदीप, २०००, संशोधन पद्धतीशास्त्र व तंत्रे, नागपूर, विद्या प्रकाशन

जोशी पं. महादेवशास्त्री, २००३, भारतीय संस्कृतीचा एनसायक्लोपीडिया, पुणे, अनमोल प्रकाशन

भिंताडे वि. रा., २००६, शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नित्यतूनन प्रकाशन

बापट भा. गो., १९७७, शैक्षणिक संशोधन पद्धती, पुणे, नित्यतूनन प्रकाशन

नाडगोडे गुरूनाथ, २००१, सामाजिक संशोधन पद्धती, कोल्हापूर, फडके प्रकाशन

जीवन कौशल्ये हेतू पाठ्यक्रम, २०१७, विश्वविद्यालय अनुदान आयोग, दिल्ली, बहादूर शाह जफर मार्ग

जीवन कौशल्ये शिक्षण मार्गदर्शिका, २०१७-१८, भाग १-२, पुणे, महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद

Government of India, 2021-22, Ministry of Education Department of School Education & Literacy

PGI, Score, 2021-2022, India

PGI  Score, 2021-2022, Maharashtra

PGI District Score-2021-22, The Category and domain wise Summary of Indicators

PGI District- Score-2021-22, District wise Score for all six categores of PGI-D for

Core team of PGI-D, Score-2021-22, Departmant of School Education

& Literacy Ministry of Education

www.vikipedya.org

| संशोधक | मार्गदर्शक |
|---|---|
| **संतोष भगवानराव शिंदे** | **डॉ. केशव वा. इंगोले**<br>प्राचार्य, राष्ट्रमाता अध्यापक विद्यालय,लोहा<br>ता. लोहा जि.नांदेड |